राष्ट्रसंचार

## सूर्यदत्तमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त

# 'सूर्यदत्त योगवारी यात्रा आरोग्याथॉन-२०२४'

**पुणे:** दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस् पुणे तर्फे 'सूर्यदत्त योगवारी यात्रा आरोग्याथॉन'चे सकाळी आयोजन करण्यात आले. पंढरीची वारी, विविध धार्मिक यात्रा आणि शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करणाऱ्या या अनोखा उपक्रमाची नोंद इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे. सूर्यदत्तमधील विद्यार्थी, शिक्षक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत योगासने व गाण्यांवर आधारित नृत्य सलग दोन तास सादर केले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया व उपाध्यक्ष सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. योगशिक्षिका सोनाली ससार व सविता गांधी यांनी योग प्रात्यक्षिके घेतली.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "यंदा 'सूर्यदत्त योगवारी यात्रा आरोग्याथॉन' हा उपक्रम घेण्यात आला. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. पुण्यभूमीत संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या विठ्ठल भक्तीला मोठा वारसा आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन 'आचार, विचार आणि आहार' असा त्रिवेणी संगमाची एक नवीन संकल्पना राबविण्यात आली."



### मुलांनी घातले सव्वाशे सूर्यनमस्कार

- विविध प्रकारचे आसने सलग १२० मिनिटे केल्याची नोंद झाली. सर्वात जास्त वेळ सूर्यनमस्कार करणाऱ्या पाच विद्यार्थ्यांना रोख बक्षीस देण्यात आले. सलग दोन तास योग प्रात्यक्षिके केल्यानंतर सूर्यनमस्कार स्पर्धेत २० मुलांनी सहभाग घेतला. त्यातील दोन मुलांनी १२५ सूर्यनमस्कार, तर काही मुलांनी ७० पेक्षा अधिक सूर्यनमस्कार घातले.

मुंबई तरुण भारत
Pune Edition | 2024-06-22 | Page- 3
epaper.mahamtb.con

# 'सूर्यदत्त योगवारी यात्रा आरोग्याथॉन'

दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस् पुणे तर्फे 'सूर्यदत्त योगवारी यात्रा आरोग्याथॉन'चे सकाळी १० ते १२ या वेळेत आयोजन करण्यात आले. पंढरीची वारी, विविध धर्मस्थळांच्या यात्रा आणि शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करणारा हा अनोखा उपक्रम विक्रमी ठरला. सूर्यदत्तमधील विद्यार्थी, शिक्षक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत योगासने गाण्यांवर आधारित नृत्य सलग दोन तास सादर केले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. संजय बी. चोरडिया व उपाध्यक्ष सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. योगशिक्षिका सोनाली ससार व सविता गांधी यांनी योग प्रात्यक्षिके घेतली. सूर्या द एज्युकेशन फाउंडेशनच्या सहयोगी उपाध्यक्ष स्नेहल नवलखा, अधिष्ठाता डॉ. प्रतीक्षा वाबळे, संचालक प्रशांत पितालिया यांच्यासह सर्व प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. डॉ. सुनील धनगर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.



Powered by iDocuments



# ‘सूर्यदत्त’मध्ये योगवारी यात्रा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ‘सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स पुणे’तर्फे ‘सूर्यदत्त योगवारी यात्रा आरोग्यथॉन’चे आयोजन करण्यात आले आहे.

पंढरीची वारी, विविध धार्मिक यात्रा आणि शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करणाऱ्या या अनोखा उपक्रमाची नोंद इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे. ‘सूर्यदत्त’मधील विद्यार्थी, शिक्षक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन योगासने व गाण्यांवर आधारित सलग नृत्य सादर केले. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक डॉ. संजय चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. योगशिक्षिका सोनाली ससार व सविता गांधी यांनी योग प्रात्यक्षिके घेतली.